॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

**नवीन पदवी अभ्यासक्रमांची माहिती**

# आज विद्यापीठात विद्यार्थी – पालकांसाठी कार्यशाळा

जळगाव दि. २७ (प्रतिनिधी) : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रशाळांमध्ये सुरु झालेल्या पदवी अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती व्हावी याशिवाय पदव्युत्तर अभ्यासक्रमांची माहिती व्हावी यासाठी विद्यापीठात उद्या शुक्रवार दि. २८ जून रोजी १२ वी आणि पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी तसेच त्यांचे पालक यांच्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाच्या वतीने सकाळी १० वाजता सिनेट सभागृहात होणाऱ्या या कार्यशाळेत कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्यासह या नवीन अभ्यासक्रमाची माहिती देणारे तज्ज्ञ प्राध्यापक संवाद साधणार आहेत. यावेळी व्य.प. सदस्य राजेंद्र नन्नवरे, डॉ. पवित्रा पाटील, अधिष्ठाता प्रा. जगदीश पाटील यांची उपस्थिती असणार आहे.

या नवीन शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठात नवीन शैक्षणिक धोरणाअंतर्गत व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेत बी.कॉम. (बीएफएसआय), भौतिकशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) हे दोन नाविन्यपूर्ण चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम सुरु होणार आहेत. सेंटर फॉर रिसर्च इन स्कीम्स ॲण्ड पॉलिसी व महाराष्ट्र शासन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत सुरु होणाऱ्या या अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना शिकाऊ प्रशिक्षणाची (ॲप्रेंटिसशिप) संधी मिळणार आहे. याशिवाय विद्यापीठाने गतवर्षी नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत संगणकशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स), गणित शास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (मॅथेमेटीकल सायन्स) आणि सामाजिक शास्त्र प्रशाळेत बी.ए. (सोशल सायन्स) हे चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम सुरु केले आहेत. या पाच अभ्यासक्रमांची तसेच विद्यापीठाच्या विविध प्रशाळांमध्ये असलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांची माहिती आणि ओळख या कार्यशाळेत करून दिली जाणार आहेत. याशिवाय विद्यापीठातील सोयी – सुविधा, प्रयोगशाळा, पायाभूत सुविधा याबद्दल देखील विद्यार्थी आणि पालकांना माहिती दिली जाईल. कार्यशाळेत इलेक्ट्रॉनिक्स सेक्टर स्किल्स कौन्सील ऑफ इंडियाच्या पश्चिम विभागाचे संचालक मंगेश मिथे, प्रा. रमेश सरदार, प्रा. जयदीप साळी, प्रा. एस.आर. कोल्हे हे देखील विद्यार्थ्यांशी संवाद साधतील. प्रवेशासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांनी तसेच पालकांनी कार्यशाळेसाठी उपस्थित राहावे असे आवाहन अंतर्गत गुणवत्ता निर्धार कक्षाचे संचालक प्रा. समीर नारखेडे यांनी केले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ — दिनांक: २७ जून, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी